मौजे खेडी व मौजे सोनेगाव राजा, ता. कामठी, जि. नागपूर या पूरग्रस्त गावातील नागरी सुविधांच्या कामांना निधी वितरीत करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्रमांक:-एफएलडी २०१६/प्र.क्र.३५/र-१२
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२
दिनांक :- ०२ जून, २०१८

वाचा :- १. शासन परिपत्रक, महसूल व वन विभाग क्र. जीटीएन १०८३/२१७/र-१२ दि.१०.०२.१९८३
२. शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र. एफएलडी २०१६/प्र.क्र.३५/र-१२ दि.११ सप्टेंबर २०१७
३. विभागीय आयुक्त,नागपूर यांचे कार्यालय पत्र क्र ससंले /बजेट /२२४५/कावि-१०१४/२०१७ दि.०४.१२.२०१७
४. शुद्धीपत्र क्रमांक, महसूल व वन विभाग क्र.एफएलडी २०१६/प्र.क्र.३५/र-१२ दि. ०२जून, २०१८

प्रस्तावना :-

मौजे खेडी व मौजे सोनेगाव राजा, ता. कामठी, जि.नागपूर या पूरग्रस्त पुनर्वसित गावांना नागरी सुविधा कामांना संदर्भ क्र.२ येथील शासन निर्णय दि. ११.०९.२०१७ अन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे. विभागीय आयुक्त, नागपूर यांनी संदर्भ क्र. ३ येथील दि.४.१२.२०१७ च्या पत्रान्वये सदर कामांसाठी निधी वितरीत करण्याची विनंती केली होती. त्यास अनुसरुन मौजे खेडी व मौजे सोनेगाव राजा, ता. कामठी, जि.नागपूर या पूरग्रस्त पुनर्वसित गावांना नागरी सुविधा कामांना निधी उपलब्ध करुन देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती .

शासन निर्णय :-

त्यानुसार मौजे खेडी व मौजे सोनेगाव राजा, ता. कामठी, जि.नागपूर या पूरग्रस्त पुनर्वसित गावांना नागरी सुविधा कामांना प्रशासकीय मान्यतेच्या २०% निधी रु.७८,०३,५४३/- सन २०१८-१९ च्या चालू वित्तीय वर्षात खर्च करण्यात खालील अटिंच्या अधीन राहून मंजूरी देण्यात येत आहे.

त्यानुसार, वित्त विभाग क्र.विअप्र.२०१३ /प्र.क्र. ३०/२०१३/विनियम, भाग -२ दि.१७.०४.२०१५ अनुसार वित्तीय अधिकार नियमपुस्तिका,१९७८ मधील भाग पहिला, उपविभाग तीन अनुक्रमांक ४ परिच्छेद क्र.२७ (२) (अ) अनुसार प्रशासकीय विभागास असलेल्या अधिकारानुसार, मौजे खेडी व मौजे सोनेगाव राजा, ता. कामठी, जि.नागपूर या पूरग्रस्त पुनर्वसित गावांना नागरी सुविधा कामांची देयके अदा करण्यासाठी रु. ७८,०३,५४३/- (रुपये अठ्ठ्याहत्तर लाख तीन हजार पाचशे त्रेचाळीस फक्त) एवढा निधी **“मागणी क्रमांक सी-६, २२४५ नैसर्गिक आपत्तीच्या निवारणार्थ सहाय्य,०२-पूर, चक्रीवादळे, इत्यादी, १०१ अनुग्रह सहाय्य, (९३) इतर (९३) (०५) पुरामुळे बाधीत झालेल्या व्यक्तिंच्या पुनर्वसनाकरिता रस्ते, पाणीपुरवठा, शाळा, चावडी, विद्युत पुरवठा इ.नागरी सुविधा यांवरील खर्च (२२४५ ०९८८) (अनिवार्य) (दत्तमत्त), ३१ सहायक अनुदाने (वेतनेत्तर)”** या लेखाशिर्षाखाली सन २०१८-२०१९ या वित्तीय वर्षात

BEAMS प्रणालीवर उपलब्ध करुन दिलेल्या तरतुदीतून विभागीय आयुक्त, नागपूर यांना खालील अटींच्या अधिन राहून उपलब्ध करून देण्यात येत आहे.

वित्तीय शिस्तीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना खालील सूचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी.

१. विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर यांनी त्यांना या आदेशान्वये प्राप्त होणारा निधी संबंधित कार्यन्वयन यंत्रणेचे अधिकारी यांचेकडे अर्थसंकल्प वितरण प्रणाली BEAMS द्वारे तात्काळ वितरीत करावा .

२. कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (बांधकाम), नागपूर यांनी या आदेशान्वये मंजूर केलेला निधी प्राप्त होताच नागरी सुविधा कामांना तात्काळ सुरुवात करुन कामांच्या प्रगतीनुसार देयक अदा करावीत तदनुषंगाने कार्यपूर्ती अहवाल शासन, विभागीय आयुक्त, नागपूर तसेच जिल्हाधिकारी नागपूर यांना सत्वर सादर करावा .

३. या आदेशान्वये मंजूर करण्यात आलेला व प्राप्त झालेला निधी मंजूर नागरी सुविधा कामांवरच खर्च करण्यात यावा तसेच सदर निधी खर्च करताना मंजूर केलेल्या अनुदानापेक्षा कोणत्याही परिस्थितीत जास्त खर्च होणार नाही याची कार्यकारी अभियंता यांनी दक्षता घ्यावी.

४. मंजूर निधी शासनाच्या पूर्वमान्यतेशिवाय अन्य कामांवर खर्च होणार नाही याची संबंधित कार्यन्वयन अधिकारी यांनी दक्षता घ्यावी.

५. सदरच्या आदेशातील नमूद मुख्यलेखाशीर्ष **मागणी क्रमांक सी - ६, २२४५ नैसर्गिक आपत्तीच्या निवारणार्थ सहाय्य,०२-पूर चक्रीवादळे, इत्यादी, १०१ अनुग्रह सहाय्य , (९३) इतर (९३) (०५) पुरामुळे बाधीत झालेल्या व्यक्तिंच्या पुनर्वसनाकरिता रस्ते, पाणीपुरवठा, शाळा, चावडी, विद्युत पुरवठा इ.नागरी सुविधा यांवरील खर्च (२२४५ ०९८८) (अनिवार्य) (दत्तमत्त) ३१ सहायक अनुदाने (वेतनेत्तर)** या लेखाशीर्षांतर्गत कोणताही वितरित केलेला निधी शिल्लक राहणार नाही अथवा सदर आदेशान्वये प्राप्त होणारा निधी संबंधित यंत्रणेच्या कोणत्याही Operational bank account /PLA (स्वीय प्रपंची खाते) मध्ये जमा करुन ठेवण्यात येणार नाही, याची संबंधित कार्यन्वयन यंत्रणेचे कार्यकारी अभियंता यांनी दक्षता घ्यावी.

६. मुख्यलेखाशीर्ष मागणी क्र. **मागणी क्रमांक सी-६, २२४५, नैसर्गिक आपत्तीच्या निवारणार्थ सहाय्य, ०२-पूर चक्रीवादळे, ईत्यादी, १०१ अनुग्रह सहाय्य , (९३) इतर, (९३) (०५) पुरामुळे बाधीत झालेल्या व्यक्तिंच्या पुनर्वसनाकरिता रस्ते, पाणीपुरवठा, शाळा, चावडी, विद्युत पुरवठा इ.नागरी सुविधा यांवरील खर्च (२२४५ ०९८८) (अनिवार्य) (दत्तमत्त), ३१ सहायक अनुदाने (वेतनेत्तर)** या लेखाशीर्षांतर्गत संबंधित संनियत्रण अधिकारी यांनी होणाऱ्या खर्चाचे स्वतंत्र लेखे ठेवून शासनाच्या प्रचलित लेखा पध्दतीनुसार ते महालेखापाल यांना सादर करावेत. तद्नुषंगाने या लेखाशीर्षाखाली होणाऱ्या खर्चाचा ताळमेळ, विनियोजन लेखे इत्यादी कामे संबंधितांनी प्रचलित पध्दतीप्रमाणे करावीत.

७. यासंदर्भातील खर्च विवरणपत्रे/ अहवाल शासनास न चुकता सादर करण्यात यावीत. वरील निधीसंबंधित खर्च ताळमेळाची विवरणपत्रे महालेखापाल कार्यालयाच्या Reconciliation Slip सह शासनास न चुकता सादर करावीत.

८. संबंधित कार्यकारी अभियंता यांनी या आदेशान्वये वितरीत निधीचे उपयोजन प्रमाणपत्र Utilisation Certificate महालेखापाल कार्यालय,संबंधित जिल्हाधिकारी/ विभागीय आयुक्त/शासनास तातडीने सादर करावे.

९. यासंदर्भातील लेखाशीर्षाखाली चालू वित्तीय वर्ष सन २०१८-२०१९ मध्ये मंजूर करण्यात आलेल्या निधीच्या अनुषंगाने खर्चाचा विनियोजन लेखा संबधितांनी विहित कालावधीत शासनास सादर करावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०६०२१३१२०३३७१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Dayanand S Munjale

Digitally signed by Dayanand S Munjale
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue And Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=831ad18b348f1d88937e4f113316b4ad736a2c6a66b967f985fda6404a710d52, cn=Dayanand S Munjale
Date: 2018.06.02 13:14:15 +05'30'

(द.शं. मुंजाळे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. महालेखापाल (लेखा परिक्षा/लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १, मुंबई
२. महालेखापाल (लेखा परिक्षा/ लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र २ नागपूर.
३. विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर
४. सह सचिव तथा वित्तीय सल्लागार (का.म-११) महसुल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
५. जिल्हाधिकारी, नागपूर
६. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर
७. जिल्हा कोषागार अधिकारी, नागपूर
८. कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद (बांधकाम) विभाग, नागपूर
९. जिल्हा पुनर्वसन अधिकारी, नागपूर
१०.कक्ष अधिकारी, कार्यासन म-११/ ब-१ महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
११.वित्त विभाग (अर्थसंकल्प शाखा- ६ /व्यय-१०), मंत्रालय, मुंबई.
१२.निवडनस्ती, कार्यासन र-१२, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.

शासन निर्णयः- महसूल व वन विभाग क्रः-एफएलडी २०१६/प्र.क्र.३५/र-१२ दि. २ जून,२०१८ सोबतचे विवरणपत्र.

मौ.खेडी व मौ.सोनेगाव राजा, ता. कामठी, जि.नागपूर या पुरग्रस्त पुनर्वसित गावांमधील नागरी सुविधा कामाकरिता निधीचा तपशील

अ.क्र	**विषय/नागरी सुविधा कामाचे नाव**	**वितरीत निधी (रुपयांत)**
१	मौजा खेडी, ता.कामठी, जिल्हा नागपूर येथे सिमेंट कॉंक्रीट रस्त्याचे बांधकाम व पेव्हिंग ब्ल बसविणे, आर.सी.सी.पाईप नाली बांधकाम, पाणी पुरवठा पाईप लाईन, हायमास्ट लाईट बसविणे इ.	१२,७८,८२९
२	मौजे सोनेगांव राजा येथील पुनर्वसन भागात शाळा बांधकाम, समाज भवन बांधकाम करणे	१९,६८,३८५
३	मौजे सोनेगाव राजा येथील पुनर्वसन भागात शाळेला आवार भिंत बांधकाम पाणी पुरव लाईन, हाय मास्ट लाईट बसविणे, व्यायाम शाळा बांधकाम करणे.	१०,६०,००५
४	मौजे सोनेगांव राजा येथील पुनर्वसन भागात कॉंक्रीट रस्ता बांधकाम करणे.	१९,९८,७५६
५	मौजे सोनेगांव राजा येथील पुनर्वसन भागात भूमिगत नाली बांधकाम (४५० मी.मी.पाईप).	१४,९७,५६८
	एकूण	**७८,०३,५४३**